सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग

# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन, राजगुरू हुतात्मा चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई-३२.

---

(प्रसिद्धिपत्रक) दि. ०८ जानेवारी २०२६

### ईव्हीएम सुसज्ज करण्याच्या कामाची राज्य निवडणूक आयुक्तांकडून पाहणी

मुंबई, दि. ८: राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज विल्सन महाविद्यालयास भेट देऊन बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकांच्या मतदानासाठी सुरू असलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (ईव्हीएम) सुसज्ज करण्याच्या कामाची पाहणी केली आणि उपस्थिती अधिकारी- कर्मचारी व उमेदवारांच्या प्रतिनिधींशी चर्चा केली.

बृहन्मंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी एकूण २३ निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे नियुक्ती करण्यात आली आहे. त्यापैकी प्रभाग क्र. २१४ ते २२२ चे निवडणूक निर्णय अधिकारी बाळासाहेब वाघचौरे असून त्यांचे कार्यालय विल्सन महाविद्यालयात आहे. श्रीमती शीतल देसाई, श्रीमती यू. टी. मुल्ला, श्री. अमोल मेश्राम, श्री. प्रशांत पाठक आणि श्री. सचिन शिंदे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहत आहेत. या सर्व अधिकाऱ्यांसह विविध उमेदवारांचे प्रतिनिधीदेखील यावेळी उपस्थित होते. या सर्वांशी श्री. वाघमारे यांनी यावेळी चर्चा केली. प्रभाग क्र. २१४ ते २२२ साठी एकूम ४६७ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यासाठी एकूण ६१० ईव्हीएम सूसज्ज करण्यात येत आहेत.

***फोटो ओळ:***

*बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी सुसज्ज करण्यात येणाऱ्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) पाहणी करताना राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे. यावेळी उपस्थित निवडणूक निर्णय अधिकारी बाळासाहेब वाघचौरे यांच्यासह इतर विविध अधिकारी आणि उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित होते.*

०-०-०